| MHPU240019942022 | **रे. मु. नं. २५४/२०२२** |
|---|---|
| | **प्रकाश बेंडे**<br>विरुद्ध<br>**लक्ष्मी खडके** |

## निशाणी क्र.१९ वरील आदेश

**०१.** प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे. त्यावर प्रतिवादींतर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला.

**०२.** वादीच्या अर्जातील कथनानुसार, वादीने ठराव, निरंतर मनाई व विकल्पतेवरुन वाटप होउन मिळणेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ चे नावे असुन त्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र.१ हिने दावा मिळकत बाळासाहेब शिवाजीराव घाडगे यांना दि.१०/०३/२०२३ रोजी र.द.नं. १२८४/२०२३ या नोंदणीकृत खरेदीखताद्वारे विक्री केलेली आहे. त्यास प्रतिवादी क्र. २ हिने मान्यता दिलेली आहे. त्यामुळे, श्री. बाळासाहेब शिवाजीराव घाडगे यांना प्रतिवादी क्र.३ म्हणुन दाव्याचे कामी सामील करुन घेणे आवश्यक आहे. तसेच, दावा कलम ६ व विनंती कलमामध्ये त्याबाबतचा मजकूर समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदर खरेदीखतातील मिळकत यापुर्वीच वादी यांना खरेदीखताने खरेदी दिलेली असुन दावा जमिनीचा ताबाही या वादीकडेच आहे. त्यामुळे, सदरचे खरेदीखत हे बेकायदेशीर असुन वादीवर बंधनकारक नाही. त्यामुळे, त्याबाबतची दुरुस्ती करणे आवश्यक असुन सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसेच, प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. नैसर्गिक न्यायतत्वानुसार, सदरची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजूर करण्यात यावा.

**०३.** प्रतिवादी क्र.१ व २ यांना दाव्याचे समन्स मिळुनदेखील दाव्याकामी हजर न राहिल्याने त्यांचेविरुद्ध दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

**०४.** वादीतर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, वादीने प्रस्तुत दावा हा ठराव, निरंतर मनाई व विकल्पतेवरुन वाटप होउन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीने नि.क्र.१८ सोबत दाखल केलेल्या

खरेदीखताचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ हिने दावा मिळकत बाळासाहेब शिवाजीराव घाडगे यांना विक्री केल्याचे दिसुन येते. त्यामुळे, अशा परिस्थितीत, मिळकतीबाबत असलेला उभय पक्षकारांमधील वाद संपुष्टात आणण्यासाठी दावा मिळकतीत हितसंबंध असलेल्या सर्व पक्षकारांना दाव्यात सामील करणे आवश्यक असते. त्यामुळे, बाळासाहेब शिवाजीराव घाडगे हे प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना दावे अर्जात प्रतिवादीपणात सामील करुन त्या अनुषंगाने दाव्याच्या सरनाम्यात व सदर खरेदीखतासंदर्भाने दाव्यात व विनंती कलमामध्ये दुरुस्ती करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत, सदरचा अर्ज मंजुर करुन प्रस्तुत दाव्यात त्यांना प्रतिवादीपणात सामील करुन त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती केली तर दाव्यात गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पूर्णपणे अधिनिर्णय करून ते निकालात काढणे न्यायालयास सोईचे होईल. शिवाय, प्रस्तुत दावा हा ठराव, निरंतर मनाई व विकल्पतेवरुन वाटप होउन मिळणेकरीता असल्याने आवश्यक पक्षकारांना त्यात सामील करुन घेणे गरजेचे आहे. त्यामुळे, याबाबत कायदेशीर बाब पाहता, दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १ नियमक्रम १०(२) व कलम ६ नियम १७ प्रमाणे बाळासाहेब शिवाजीराव घाडगे हे आवश्यक पक्षकार असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. सदरचा अर्ज निशाणी क्र.१९ हा मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींना असा आदेश देण्यात येतो की, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती क्र.१ ते ३ प्रमाणे दाव्यात १४ दिवसाचे आत किंवा पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्वाक्षरी/—
**(श्रीमती एम. एस. माळी)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घोडेगांव, जि. पुणे.

दि.१८/०३/२०२४
स्थळ : पुणे.